# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग

मा. महासभा दि. 07/06/2019

// गोषवारा //

**प्रकरण क्र. 12 :- नविन खेळणी, बेंचेस, व्यायाम साहित्य, लालमाती खरेदी करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणे.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात 74 उद्याने, 14 स्मशाने, 11 मैदाने, 2 चौपाटया व 17 दुभाजक विकसीत केलेली आहेत तसेच नव्याने आरक्षणे विकसीत केलेल्या उद्याने, मैदाने येथे लहान मुलांना खेळण्याकरीता नविन खेळणी बसविणे तसेच नागरीकांना व्यायाम करणेकरीता खुल्या जागेतील व्यायामाचे साहित्य पुरवठा करुन बसविणे तसेच जुनी नादुरुस्त झालेली खेळणी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सन 2019-20 या आर्थिक वर्षात "नविन खेळणी/बेंचेस/व्यायामाचे साहित्या बसविणे" या लेखाशिर्षाका खाली रु. 2.00 कोटीची तरतुद केलेली असून त्याकामी वार्षिक निविदा मागवून काम करुन घेणे आवश्यक आहे.

तसेच उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजक येथील लागवड करण्यात आलेली शोभिवंत फुलझाडे, मोठी झाडे तसेच लॉन यांना लालमातीची भर देणे व शेणखत टाकणे आवश्यक असते तसेच उद्यानामध्ये बसविण्यात आलेल्या खेळण्याखाली मुलांना इजा / दुखापत होऊ नये म्हणून सफेदरेती टाकणे आवश्यक आहे. सन 2019-20 या आर्थीक वर्षात "माती, शेणखत व सफेदरेती" या लेखाशिर्षका खाली रु. 2.00 कोटी इतकी तरतूद केलेली आहे. तरी सदर कामी वार्षिक निविदा मागवून काम करुन घेणे आवश्यक आहे.

त्याकामी नविन खेळणी, बेंचेस, व्यायाम साहित्य पुरवठा करुन बसविणे व लालमाती, शेणखत व सफेदरेती खरेदी करणे कामाच्या वार्षिक खर्चाकरीता मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

**उप. आयुक्त (उद्यान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान व वृक्ष प्राधिकरण विभाग
मा. महासभा दि. 07/06/2019

// गोषवारा //

**प्रकरण क्र. 24 :- शहरातील उदयाने बगीचा, मैदाने, दुभाजक हे देखभाल, दुरुस्ती, सुरक्षा, झाडे लावणे, जगविणे, खेळणी दुरुस्ती करणे, रंगरंगोटी करणे इत्यादी कामाचे धोरण ठरविणे.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये 74 उदयाने, 11 मैदाने, 14 स्मशाने, 2 चौपाटया, 1 नर्सरी, 17 किमी लांबीचे दुभाजक असून इत्यादी ठिकाणची साफ-सफाई करणे, गवत कटींग करणे, कचरा उचलणे, झाडांना पाणी मारणे, इत्यादी दैनंदिन देखभालीची कामे करणे आवश्यक आहे. त्याकरीता उद्याने, मैदाने, स्मशाने, चौपाट्या व दुभाजके यांच्या निगा देखभालीच्या कामासाठी प्रती चौ.मी. प्रमाणे निविदा मागविणे आवश्यक आहे.

तसेच उद्यानातील खराब झालेले गवत व शोभिवंत झाडे लावणे तसेच नव्याने विकसीत करण्यात येणारे उद्याने येथे सुशोभिकरण करणे आवश्यक आहे. त्याकामी उपरोक्त कामाकरीता खालील प्रमाणे वार्षिक निविदा मागविणे आवश्यक आहे.

**रु. लाखात**

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | तरतुद |
|---|---|---|---|
| 1. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उदयाने, मैदाने, दुभाजके इत्यादी ठिकाणी निगा व देखभाल करणे. | "मजुर पुरवठा / उद्याने, मैदाने, दुभाजक निगा व देखभाल इत्यादी" | 800.00 |
| 2. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्यान, मैदाने, दुभाजके व इत्यादी सुशोभिकरण करणे. | "उद्याने / दुभाजक सुशोभिकरण करणे" | 300.00 |

उपरोक्त प्रमाणे वार्षिक कामाच्या खर्चाकरीता मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

**उप. आयुक्त (उद्यान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**